प्रेस नोट दिनांक ०१/०८/२०२२

**बनावट फेसबुक आयडीचा वापर करून खंडणी उकळणा—या आरोपीतास सापळा रचुन अटक केले बाबत.**

फिर्यादी श्री. मुकेश प्रकाश शर्मा, वय ५२ वर्षे, धंदा :— नोकरी, रा.ठि. फ्लॅट नं. ७०४, बिल्डींग नं. ३, डिसकव्हारी कौ ऑप हौ सोसायटी, राजेंद्रनगर, बोरीवली पुर्व, मुंबई ६६ याचे Mukesh Sharma या नावाने असलेल्या फेसबुक अकाऊंटवर माहे मे २०२२ मध्ये Kalawati Patil या नावाने त्यांना फेसबुकवर फ्रेन्ड रिक्वेस्ट आली होती. त्यामधील फोटो हा त्यांचे बिल्डींगमधील तोंड ओळखीचे दिसल्याने त्यांनी ती फ्रेन्ड रिक्वेस्ट स्विकारली. त्यानंतर दिनांक ०६/०७/२०२२ रोजी सदरचे फेसबुक आयडी वरून Hello, Hi, आप किधर दिखाई नही देतो हो असे मेसेज येत होते त्यांना त्यांनी नॉर्मल रिप्लाय दिला होता. त्यानंतर सदरचे अकाउंट वरून त्यांचेशी फेसबुकचे मॅसेंजर या ॲपचे माध्यमातुन चॅटींग सुरू केली. त्यावेळी समोरील व्यक्तीने त्यांचेशी रोमांटीक बोलणे सुरू करून काही अश्लिल छायाचित्र पाठविले. त्यानंतर सदर समोरील व्यक्तीने त्यांच्यातील चॅटींग चे स्क्रिन शॉट फिर्यादींना पाठवुन फिर्यादीना ते सोसायटीचे ग्रुप मध्ये व्हायरल करण्याचे तसेच कुटुंबीयाना पाठविण्याचे वारंवार धमकी देवुन यातील फिर्यादी यांचेकडुन वेळोवेळी १०,०००/— रूपये खंडणी स्वरूपात घेतले व इतर १० ते १५ सोसायटी सदस्यांना अशाच प्रकारचे अश्लिल मेसेज पाठवुन पैशाची मागणी करीत होता.

तसेच महिला नामे श्रीमती कलावती पाटील यांनी त्यांना माहे मे २०२२ मध्ये सोसायटी सदस्यांकडुन कळाले की, ते फेसबुक फ्रेन्ड असताना, त्यांचे दुसरे नावाचे फेसबुक वरून पुन्हा फ्रेन्ड रिक्वेस्ट येत आहेत तसेच काही सदस्यांनी सदर फेसबुक खातेवरून वेगळया पध्दतीची चॅटींग होत असल्याचे सांगितले व ते मेसेज त्यांना दाखविले. या घटनेमुळे त्या खुप घाबरून मानसिक तणावाखाली होत्या तसेच नमुद सोसायटी मध्ये घबराटीचे वातावरण निर्माण झाले होते परंतु कोणीही सदस्य पुढाकार घेण्यास घाबरत होते, परंतु दिनांक ३०/०७/२०२२ रोजी फिर्यादीना नमुद व्यक्तीने जिवे ठार मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी व महिला असे हिम्मत करून कस्तुरबा मार्ग पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांना भेटुन माहिती दिली.

व.पो.नि. कस्तुरबा मार्ग पोलीस ठाणे, मुंबई यांनी सदर प्रकरणाची माहिती मा. अप्पर पोलीस आयुक्त, उ.प्रा.वि, मा. पोलीस उपायुक्त, परीमंडळ १२, मुंबई व मा. स. पो.आ. दहिसर विभाग, मुंबई यांना देवुन त्यांचे मार्गदर्शनाप्रमाणे देवुन त्यांचे मार्गदर्शनाखाली व.पो.नि. कस्तुरबा मार्ग पोलीस ठाणे, मुंबई यांनी पो.नि जगदाळे, पो.उ. नि. दुधमल, गुन्हे प्रकटीकरण अधिकारी पो.उ.नि. वाळुंजकर व पथक तयार करून ते फिर्यादीसोबत घटनास्थळी कारवाईकरीता पाठविले.

सदर ठिकाणी पोलीस पथकाने सापळा रचुन एका कागदी पाकीटात रूपये १०,०००/— पैसे असल्याचे भासवुन कोरे कागद फोल्ड करून कार क्रमांक एम.एच ०२ सी.व्ही ७७४८ हीचे मागील डावे टायर जवळ ठेवले व सर्वजण नमुद इसमाची वाट पाहत आडोशाला थांबले. त्यावेळी काही वेळातच एक इसम त्यांनी पाकीट ठेवलेल्या

मोटर कार जवळ आला व सदर इसमाने ठेवलेले पाकीट घेतले त्यावेळेस नमुद पोलीस पथकाने त्यास ताब्यात घेवुन त्याचे नाव व पत्ता विचारला असता त्यांने त्याचे नाव सुशांत विजय तळाशिलकर वय २९ वर्षे, रा.ठि. फ्लॅट नं. ३०२, बिल्डींग नं. ३, डिसकव्हारी कौ ऑप हौ सोसायटी, राजेंद्रनगर, बोरीवली पुर्व, मुंबई ६६ असे सांगितले असता त्यास पुढील तपासकामी पोलीस ठाणेस घेवुन आले.

सदरबाबत फिर्यादीचा सविस्तर जबाब नोंद करून फिर्यादी यांनी नमुद इसमाविरूध्द दिलेल्या तक्रारीवरून कस्तुरबा मार्ग पपोलीस ठाणेस ११३६/२२ कलम ३८७ भा.दं.वि. सह कलम ६६ (ड) माहिती तंत्रज्ञान कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर आरोपीतास नमुद गुन्हयात अटक करण्यात आली असुन त्यास रिमांडकामी मा. न्यायालयात हजर केले असता, मा. न्यायालयाने त्यांना दिनांक ०३/०८/२०२२ रोजी पर्यंत पोलीस कोठडी दिली आहे. नमुद गुन्हयाचा अधिक तपास चालु आहे.